# उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांचे कार्यालय,

(बी.एस.एन.एल., संचारलक्ष्मी बिल्डींग, कस्तूरचंद पार्क समोर, नागपूर-४४०००१, दुरध्वनी क्र. ०७१२ २५६५६२४, ईमेल-dycfnagpur.mfd@nic.in)

**विषय:-** Proposal for diversion of 0.34 ha. forest land for rehabilitation and up gradation of Nagpur-Katol-Warud-National Highway (NH-753) from existing KM 60+100 (End of Katol bypass) to 101+085(Warud up to Joint junction) to two lane with paved shoulders in the Maharashtra on EPC Mode.

क्रमांक कक्ष-11/वनसंवर्धन/प्र.क्र.502/2020-21/ नागपूर, दिनांक

प्रति,
कार्यकारी अभियंता,
नॅशनल हायवे डिवीजन,
नागपूर - 440001

**संदर्भ:** 1. कार्यकारी अभियंता, नॅशनल हायवे डिवीजन, नागपूर-440001 यांचे पत्र क्र. 4503/Tech/PO-IV/2021, दि. 06/08/2021.
2. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-11/वनसंवर्धन/प्र.क्र.502/1820, दिनांक 16/12/2021.
3. सहा. वनसंरक्षक (काटोल), नागपूर वनविभाग, नागपूर यांचेकडील पत्र क्र. सवसं/काटोल/2020-21/226, दि.25/10/2021
4. कार्यकारी अभियंता, नॅशनल हायवे डिवीजन, नागपूर-440001 यांचे पत्र क्र. 3560/Tech/PO-III/2022, दि.25/07/2022.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम, 1980 चे कलम 2 अंतर्गत नागपूर जिल्हयातील नागपूर-काटोल-वरुड (नॅशनल हायवे-753) रस्त्यांचे बांधकामाकरिता 0.34 हे. क्षेत्राचा वनजमिन वळतीकरणाचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावाचे तपासणी केली असता प्रस्तावातील 1 ते 11 मुद्यांची पुर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेस्तव कळविण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने आपलेकडील संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वये 1 ते 11 त्रुटयांची पूर्तता करुन प्रस्ताव या कार्यालयास फेर सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावाची पाहणी केली असता सदर प्रस्तावात पुर्वी नमुद केलेल्या त्रुटयांची पूर्तता तर केलीच नाही. परंतू नव्याने काही त्रुटया दिसुन येत आहे. त्या खालीलप्रमाणे आहेत.

1. वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत 1 ते 57 मुद्दयांची अद्यावत चेकलिस्टवर पृष्ठ क्रमाक नमुद नाही.
2. संदर्भिय पत्र क्र. 2 मधील मुद्या क्र. 3, 6,8 ची पूर्तता केलेली नाही.
3. प्रस्तावासोबत सहपत्रीत केलेल्या केएमएल सीडीमध्ये Area Statement मध्ये नमूद Component/Itemwise break गावाचे नाव, सर्व्हे क्रमांक, क्षेत्र Properties, Compartment क्रमांक व Boundary सुध्दा दर्शविण्यात यावी.
4. संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये सहा. वनसंरक्षक (काटोल) यांचेकडून प्राप्त अहवालात स्पष्ट उल्लेख केलेला आहे की, सदर प्रकल्पबाधित क्षेत्र मौजा भारसिंगी, सर्व्हे क्र.26 मध्ये पुलाचे पायाचे बांधकाम झाल्याचे असुन वनभंग झाला असल्याचे नमुद केलेले आहे. परंतू आपणाकडून प्राप्त संदर्भिय पत्र क्र. 4 मधील मुद्या क्र. 10 बाधित क्षेत्रात वनभंग झाला नसल्याचे नमुद केलेले आहे. करिता सदर क्षेत्रात वनभंग झाला असल्याने वनभंग झाला असल्याचे प्रमाणपत्र, वनभंग अहवाल टिप्पणीसह (कामे कोणत्या वर्षी, कुणी केलीत, त्यांचेवर कोणती कार्यवाही करण्यात आली) तात्काळ या कार्यालयास सादर करावा.
5. सहा. वनसंरक्षक यांचेशी समन्वय साधून सदर प्रकल्पबाधित वनक्षेत्राऐवजी पर्यायी वनीकरणाकरीता प्रकल्पबाधित वनक्षेत्राऐवजी दुप्पट अवनत झुडपी जंगल क्षेत्र उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. तरी त्याबाबत पर्यायी वनीकरणाची वनजमिन रोपवन योग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र, 10 वर्षाची पर्यायी वनीकरणाची योजना, टोपोशिट व गावनकाशा, Geo Refferemce Map, 7/12 उतारे ईत्यांदी KML फाईलसह प्रस्तावासोबत जोडण्यात यावेत.
6. प्रस्तावासोबत प्रकल्प यंत्रणेनी एनपीव्ही भरणा करण्याबाबतचे प्रमाणपत्र, पर्यायी वनीकरणाची रक्कम भरणा करण्याचे प्रमाणपत्र सोबत सादर केलेले नाहीत.
7. Project Cost प्रमाणपत्र निरंक स्वाक्षरी केल्याचे दिसुन येते.

वरिल त्रुटयांची पूर्तता करुनच परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात यावा, करिता सदर प्रस्ताव ५ प्रतित परत करण्यात येत आहे.

सहपत्र:- ५ प्रतित प्रस्ताव

(डॉ. भारत सिंह हाडा)
**उपवनसंरक्षक (प्रादेशिक)**
**नागपूर वनविभाग, नागपूर**

प्रतिलीपी:- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
प्रतिलीपी:- मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.